# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 201
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : सोमवार , दिनांक 28 एप्रिल 2025
**(Day and Date)** : Monday, 28 April 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 201 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 201 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 09 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | ऑनलाईन उपस्थित | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

<table>
<tr><th colspan="2">अनु.क्रमांक<br>Subject No.</th><th>तपशील<br>Details</th></tr>
<tr><td>201.1</td><td></td><td>स्वागत<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.</td></tr>
<tr><td>201.2</td><td>201.2.1</td><td>दिनांक 28 मार्च 2025 रोजी झालेल्या 200 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>व्यवस्थापन मंडळ ठराव : दिनांक 28 मार्च 2025 रोजी झालेल्या 200 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. या इतिवृत्तात समाविष्ट असलेल्या वित्त विभागाच्या इतिवृत्तातील ठराव क्र. 200.3.7 मध्ये ज्ञानदंडाच्या चांदीच्या खरेदीबाबत नजरचुकीने झालेल्या वजनामध्ये दुरुस्ती करून ठरावात सुधारणा करण्यात आली. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td></td><td>201.2.2</td><td>दिनांक 28 मार्च 2025 रोजी झालेल्या 200 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>व्यवस्थापन मंडळ ठराव : दिनांक 28 मार्च 2025 रोजी झालेल्या 200 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील ठरावांचा कार्यवाहीचा अहवाल श्री. भरड यांनी वाचून दाखविला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td>201.3</td><td></td><td>सखोल चर्चेचे विषय</td></tr>
<tr><td></td><td>201.3.1<br>विद्यार्थी सेवा विभाग</td><td>विभागीय केंद्रांच्या पुनर्रचनेबाबत....<br>टिपणी : विद्यार्थी सेवा विभाग सल्लागार समितीची बैठक दिनांक 11 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता व्यवस्थापन मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे मुंबई विभागीय केंद्रांतर्गत पूर्वीप्रमाणेच रायगड जिल्ह्याचा समावेश ठेवण्यात यावा. पुणे विभागीय केंद्रांतर्गत असणाऱ्या सातारा जिल्हा हा पुणे विभागातच ठेवण्यात यावा. तसेच बारामती विभागीय केंद्रांतर्गत दौंड, बारामती, इंदापूर, पुरंदर (तालुके 4 पुणे जिल्ह्यातील) व सोलापूर जिल्ह्याचा समावेश असावा असे ठरले. मुंबई, पुणे व बारामती विभागीय केंद्रांची रचना
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विभागीय केंद्र</th><th>जोडण्यात येणारे जिल्हे</th></tr>
<tr><td>1</td><td>मुंबई विभागीय केंद्र</td><td>मुंबई शहर, उपनगरे, रायगड</td></tr>
<tr><td>2</td><td>पुणे विभागीय केंद्र</td><td>पुणे (पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर तालुके वगळून), सातारा, अहिल्यानगर</td></tr>
<tr><td>3</td><td>बारामती विभागीय केंद्र</td><td>पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर तालुके व सोलापूर जिल्हा</td></tr>
</table>
खालीलप्रमाणे करण्यास तसेच सदरचा विषय व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br>व्यवस्थापन मंडळ ठराव : दि. 28 मार्च 2025 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सदर विषयाला मान्यता दिलेली होती. त्यात समाविष्ट केलेल्या रायगड जिल्हा पुणे विभागाअंतर्गत दर्शविण्यात आला होता. परंतु रायगड मधील महाविद्यालये ही मुंबई विद्यापीठाशी संलग्नित आहेत त्यामुळे रायगड जिल्हा मुंबई विभागाअंतर्गत समाविष्ट करावा असा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाला. व्यावहारिक दृष्ट्या हे योग्य असल्याने वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. सबब सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला. या विषयाला मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली.</td></tr>
<tr><td></td><td>201.3.2<br>परीक्षा विभाग</td><td>विद्यापीठाच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका डी.टी.पी. करण्यासाठी गोपनिय प्रिंटरसमवेत करावयाच्या करारास, मा. परीक्षा मंडळाने केलेली मुदतवाढीची शिफारस मान्यतेसाठी सादर...<br>टिपणी : परीक्षा मंडळ ठराव क्र. 55.2.01 मधील शिफारस क्र. 3 नुसार गोपनीय प्रिंटरसमवेत सद्यस्थितीतील करारास दिनांक 03 मे 2025 पासून पुढील सहा महिन्यांसाठी अथवा मे/जून 2025 परीक्षेसाठी मुदतवाढ करण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>व्यवस्थापन मंडळ ठराव : परीक्षा मंडळाच्या ठरावातील शिफारस क्र. 3 नुसार गोपनिय प्रिंटरसमवेत सद्यस्थितीतील करारास दिनांक 03 मे 2025 पासून पुढील सहा महिन्यांसाठी अथवा मे/जून 2025 परीक्षेसाठी मुदतवाढ करण्याच्या परीक्षा मंडळाने केलेल्या शिफारसीला मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 201.3.3<br>परीक्षा विभाग | **विद्यापीठातील विद्यार्थ्यांना द्यावयाचे सुवर्णपदक प्रदान करण्यासाठी सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या Rule No. 1 मधील 2.9 नुसार नमूद केलेल्या समितीची पुनर्रचना करणे व यातील सुवर्णपदक प्रदान करण्याच्या नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेसंदर्भात....**<br>**टिपणी :** विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या स्नातकांना विद्यापीठान्वये तयार केलेल्या Rule No. 1 – Rules Regarding Institution of Prize Acceptance of Endowments मधील 2.9 मध्ये सुवर्णपदके/पारितोषिके प्रदान करण्याची तरतूद आहे.<br>विद्यापीठ कायद्यात RULE 2.9 मध्ये Hon. VC, Executive Director SSD, Executive Director Academic Division, Registrar & Finance Officer याप्रमाणे समिती गठित करण्याची तरतूद आहे. मात्र सध्या विद्यापीठात Executive Director – SSD, Academic Division ही पदे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे सुवर्णपदक व पारितोषिके नियमावली तयार करण्यासाठी समितीमध्ये खालीलप्रमाणे बदल करणेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे सादर...<br>1. Hon. Vice-Chacellor – Chairman<br>2. Hon. Pro Vice-Chancellor – Member<br>3. Registrar – Member<br>4. Finance Officer – Member<br>5. One AP/Professor nominated by Hon. Vice-Chancellor – Member<br>6. Controller of Examination – Member Secretary<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या स्नातकांना विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या सुवर्णपदके/पारितोषिकांसाठीच्या तरतूदीमध्ये सद्य काळाप्रमाणे सुसंगत करण्याची गरज लक्षात घेऊन सुवर्णपदकांसाठी/पारितोषिंकासाठी Rule No. 1 मध्ये नमूद केलेल्या नियमावली तयार करण्याच्या पुनर्गठीत समितीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. समितीद्वारे तयार करण्यात येणारी नियमावली मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल मा. अध्यक्ष तथा कुलगुरू यांनी सांगितले त्यास सर्व सदस्यांनी अनुमोदन दिले. |
| | 201.3.4<br>आस्थापना कक्ष | **करार पध्दतीने कुलसचिव पदाच्या नेमणुकीसाठी गठित समितीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** विद्यमान कुलसचिव श्री. दिलीप भरड हे नियत वयोमानानुसार दि. 30.4.2025 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे दि. 1.5.2025 पासून कुलसचिव पद रिक्त होणार आहे. सदर पद रिक्त झाल्यानंतर निवड प्रक्रियेकरिता कालावधी लागणार आहे. या कालावधीपर्यंत विद्यापीठाच्या परिनियम क्र. 11 (2 ऑफ 1993) अंतर्गत तरततुदीनुसार करार पद्धतीने कुलसचिव पदाच्या नेमणुकीबाबतचा प्रस्ताव दि. 28.3.2025 रोजीच्या ठराव क्र. 200.4.1 नुसार मा.व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरून उपरोक्त संदर्भाकिंत ठरावानुसार करार पद्धतीने कुलसचिव पदाच्या नेमणुकीसाठी समितीचे गठण करण्यात आले. सदरच्या गठीत समितीची बैठक दिनांक 26.4.2025 रोजी, सकाळी 10.30 वा. आयोजित करण्यात येत आहे.<br>करार पद्धतीने कुलसचिव पदाच्या नेमणुकीसाठी गठीत समितीचा अहवाल मा.व्यवस्थापन मंडळ सभेच्या पटलावर सादर करण्यात येईल. सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या स्विकृती व मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 26-4-2025 रोजी झालेल्या करार पद्धतीने कुलसचिव पदाच्या नेमणुकीसाठी गठीत केलेल्या समितीच्या बैठकीचा अहवाल विचारार्थ आणि मान्यतेसाठी बंद पाकीटात ठेवण्यात आला. सदर अहवाल मा. कुलगुरुंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेत वाचून दाखविला आला. सदर अहवाल सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्य करून श्री. दिलीप भास्करराव भरड यांची दि. 01-05-2025 पासून पुढील दोन वर्षाकरिता किंवा विद्यापीठात नियमित कुलसचिवांची निवडप्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कुलसचिवांच्या नियुक्तीपर्यंत यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील अशीही मान्यता प्रदान करण्यात आली.<br>श्री. दिलीप भरड यांना दोन वर्ष करार पद्धतीने एकत्रित वेतनावर (पे मायनस पेन्शन) याप्रमाणे त्यात महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार वाढ देण्यात व निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार नियुक्ती करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान करण्यात आली.<br>सदर विषयाच्या चर्चेदरम्यान विद्यमान कुलसचिव श्री. दिलीप भरड हे मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव असतानाही हा विषय त्यांच्याशी निगडीत असल्याने या विषयावरील चर्चेच्या सुरुवातीपासून |

| | | |
|---|---|---|
| | | ते ठराव होईपर्यंत ते सभागृहाच्या बाहेर थांबले होते. हा विषय याच बैठकीत ठेवून याच बैठकीत कायम करण्यात आला.<br>हा ठराव एकमताने संमत केल्यानंतर मा. व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांनी श्री. भरड यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. |
| 201.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 201.4.1<br>आस्थापना कक्ष | **श्री. रणजित कारभारी अहिरे यांची एकत्रित वेतनावर 2 वर्ष दि. 02.04.2025 रोजी पूर्ण झालेली असल्याने पुढील मुदतवाढीचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसतव सादर.....**<br>**टिपणी :** विद्यापीठात करारावर एकत्रित वेतनावर मनुष्यबळ नियुक्त करताना परिनियम व कायद्यातील तरतूदीनुसार करण्यात येते. त्यातील विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्ष कालावधीसाठीची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने 1 वर्ष नियुक्ती करण्यात येते. श्री. रणजित कारभारी अहिरे संयोजक (शैक्षणिक) मूल्यमापन विभाग यांची मा. कुलगुरूंच्या अखत्यारित असलेले 2 वर्ष कालावधी 02.04.2025 रोजी संपुष्टात येत असल्याने मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळ यांनी मुदतवाढ देण्यास मान्यता दिलेली आहे. सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांनी दिलेल्या श्री. रणजित कारभारी अहिरे संयोजक (शैक्षणिक) मूल्यमापन विभाग यांच्या करारावरील 1 वर्षाच्या पुर्ननियुक्तीच्या मान्यतेला मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान केली. |
| | 201.4.2<br>विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | **विद्यापीठामार्फत देण्यात येणारा 'शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार (सन 2023)', 'ज्ञानदीप पुरस्कार (सन 2023)' व 'रूख्मिणी पुरस्कार (सन 2023)' देण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** विद्यापीठामार्फत 'शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार', 'ज्ञानदीप पुरस्कार' व 'रूख्मिणी पुरस्कार' देण्यात येतात. सन 2023 चे पुरस्कार प्रदान करण्यासाठी समितीची बैठक अनुक्रमे 04 एप्रिल 2025, दिनांक 08 एप्रिल 2025 व दि. 17 एप्रिल 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे पुरस्कार देण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार (2023) - डॉ. तक्षशिला हरगोविंद मोटघरे<br>ज्ञानदीप पुरस्कार (2023) – डॉ. संजय रत्नपारखी<br>रुख्मिणी पुस्कार (2023) – श्रीमती दिपा पवार<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** सन 2023चे पुरस्कार प्रदान करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या अनुक्रमे 04 एप्रिल 2025, दिनांक 08 एप्रिल 2025 व दि. 17 एप्रिल 2025 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकांच्या इतिवृत्तास आणि समितीने पुरस्कारासाठी शिफारस केलेल्या<br>शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार (2023) - **डॉ. तक्षशिला हरगोविंद मोटघरे**<br>ज्ञानदीप पुरस्कार (2023) – **डॉ. संजय रत्नपारखी**<br>रुख्मिणी पुस्कार (2023) – **श्रीमती दिपा पवार**<br>या नावांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता प्रदान केली. |
| | 201.4.3<br>विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | **विद्यापीठामार्फत देण्यात येणारा 'श्रमसेवा पुरस्कार सन 2023' रद्द करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** विद्यापीठामार्फत देण्यात येणारा 'श्रमसेवा पुरस्कार सन 2023' करिता दिनांक 11 मार्च 2025 व 26 एप्रिल 2025 रोजी पुरस्कार निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकांचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर अवलोकन व मान्यतेस्तव सादर. 'श्रमसेवा पुरस्कार सन 2023' पुरस्कारासाठी श्रीमती संगिता सांगळे आणि श्रीमती वैशाली नान्नोर असे दोनच प्रस्ताव प्राप्त झाले. या दोनच प्रस्तावांमधून निवड करणे निवड समितीला संयुक्तीक वाटले नाही. सबब निवड समितीच्या दोन्ही बैठकांमध्ये ठरल्याप्रमाणे सन 2023 साठीचा 'श्रमसेवा पुरस्कार' रद्द करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** 'श्रमसेवा पुरस्कार सन 2023' साठी गठीत केलेल्या निवड समितीच्या दोन्ही बैठकांचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळापुढे सादर केले. सदर इतिवृत्त आणि निवड समितीने केलेल्या 'श्रमसेवा पुरस्कार 2023' हा पुरस्कार या वर्षासाठी रद्द करण्याच्या शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. तसेच 2024मध्ये |

| | | |
|---|---|---|
| | | येणाऱ्या प्रस्तावांमध्ये 2023 मधील श्रीमती संगिता सांगळे आणि श्रीमती वैशाली नान्नोर या दोन प्रस्तावांचा समावेश करण्यात यावा अशी शिफारस केली. |
| | 201.4.4<br>नोंदणी कक्ष | **विद्यार्थ्यांच्या नाव, आडनाव, वडीलांच्या तसेच आईच्या नावात दुरुस्ती किंवा प्रोफोईल फोटोबदलसाठी रु. 300/- इतके शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** विद्यापीठात प्रवेश घेणारे बरेच विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्याने सायबर कॅफे, मित्र किंवा नातलग यांचेमार्फत प्रवशेश अर्ज ऑनलाईन भरतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या माहितीत चुका होतात. प्रवेशाच्या वेळी हे विद्यार्थ्याला लक्षात येत नाही. हॉलतिकीट, गुणपत्रक किंवा प्रमाणपत्रात विद्यार्थ्याला चुका आढळून येतात. यापूर्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनने त्यांचा डेटा सुधारण्याची सुविधा उपलब्ध होती. परंतु प्रशासकीय कारणास्तव ही 2023-24 पासून ही सुविधा बंद करण्यात आली. नोंदणी कक्षामार्फत पुढील प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>1. चालू शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमधील दुरुस्ती ही नोंदणी कक्षामार्फत विनामुल्य करण्यात यावी.<br>2. विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रक्रियेचे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्यानंतर प्रोफाईलमधील दुरुस्तीसाठी विद्यार्थ्याकडून रु. 300/- आकारण्यात यावे. सदर शुल्क वित्त विभागाच्या Profile Change Fee 7074 या अर्थशिर्षात भरण्यास यावे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरमधील विद्यार्थी प्रोफाईलमध्ये विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून करावयाच्या सुधारणाबाबत नोंदणी कक्षाने सादर केलेल्या पुढील प्रस्तावांना<br>1. चालू शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमधील दुरुस्ती ही नोंदणी कक्षामार्फत विनामुल्य करण्यात यावी.<br>2. विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रक्रियेचे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्यानंतर प्रोफाईलमधील दुरुस्तीसाठी विद्यार्थ्याकडून रु. 300/- आकारण्यात यावे. सदर शुल्क वित्त विभागाच्या Profile Change Fee 7074 या अर्थशिर्षात भरण्यास यावे.<br>मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 201.4.5<br>नोंदणी कक्ष | **वाशिम येथे विद्यापीठाचे जिल्हा केंद्र स्थापन करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ला अनुरूप शिक्षणप्रणाली विकसित करण्यास विद्यापीठाने सुरूवात केली असून व्यावसायिक शिक्षण, दूरस्थ शिक्षणाबरोबरच ऑनलाईन शिक्षण, कृषी शिक्षण आणि विस्तार, संशोधन व स्टार्टअप प्रोत्साहन व गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ करण्यासाठी वाशिम येथे जिल्हाकेंद्र स्थापन करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. अध्यक्ष तथा मा. कुलगुरू यांनी याविषयासंदर्भातील पार्श्वभूमी विषद केली. वाशिम जिल्हा हा विदर्भातील प्रमुख जिल्हा आहे. तरीही येथे शिक्षणाच्या संधींचा अभाव आहे. येथील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी विदर्भातील मुख्य शहरांकडे जात नाहीत किंवा प्रमाणही कमी आहे. त्यांच्यासाठी जिल्हा केंद्र स्थापन केल्यास तेथे कौशल्य विकास, अभ्यासिका, वाचनालय, विद्यापीठाच्या प्रशासकीय सेवा सुरू करता येईल. तसेच या विद्यार्थांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शनही उपलब्ध करून देता येईल.<br>यासोबतच वर्धा येथील जिल्हाधिकाऱ्यांनी वर्धा जिल्ह्यात जिल्हा केंद्र स्थापन करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली आहे. त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद वित्त समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.<br>मा. कुलगुरू तथा अध्यक्षांनी प्रस्तावित केलेल्या 'वाशिम' आणि 'वर्धा' येथे जिल्हाकेंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते अनुमती दिली. |
| | 201.4.6<br>वित्त विभाग | **विद्यापीठाच्या मानधन, प्रवास व दैनंदिन भत्ता इत्यादी दरांमध्ये सुधारणा करणेबाबतचा अध्यादेश तयार करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मान्यतेस्तव सादर ....**<br>**टिपणी :** सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार विद्यापीठाने कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरांमध्ये सुधारणा केली आहे. तसेच विद्यापीठाची मान्यताप्राप्त विभागीय केंद्रे, अभ्यासकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरामध्ये सुधारणा करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती. त्यानुसार वित्त समितीत बैठक क्र. 18-2024-25, 22 जानेवारी 20245 मधील ठराव क्र. 11 व मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतल ठराव क्र. 198.3.5 दि. 27 जानेवारी 2025 नुसार मानधन, प्रावस व दैनंदिन |

| | | |
|---|---|---|
| | | भत्ता इत्यादी दरांच्या सुधारणेबाबतचा अध्यादेशाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या वित्त समिती बैठक क्र. 18-2024-25 दि. 22 जानेवारी, 2025 मधील ठराव क्र. 11 व मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 198.3.5 दि. 27 जानेवारी, 2025 नुसार मानधन, प्रवास व दैनंदिन भत्ता इत्यादी विविध मानधन दरामध्ये सुधारणा करणेच्या अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मात्र सदर अहवालाचे रुपांतर अध्यादेशात करण्याबाबत प्रशासनाला निर्देशित करण्यात आले. त्यानुसार सदर अध्यादेश तयार करण्यात आला असून, त्यानुसार सदर अध्यादेश शासनाच्या माहिती तथा मान्यतेस्तव शासनास सादर करणेस व सदर अध्यादेशास शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून दि. 01 मे, 2025 पासून लागु करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 201.4.7<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या शिक्षकांना CAS साठी भरावयाच्या तक्त्यात विद्यापीठाच्या अनुषंगिक कामांचा उल्लेख करावयाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ....**<br>**टिपणी :** सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार शिक्षकांचे मुल्यांकन करण्याचा प्रोफॉर्मा तयार केला आहे. त्यानुसार शिक्षकांनी केलेल्या कामांचा त्यात समावेश केला जातो. परंतु पारंपरिक विद्यापीठातील शिक्षकांचे काम आणि मुक्त विद्यापीठातील शिक्षकांचे काम यात तफावत आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमावलीत मुक्त विद्यापीठाच्या शिक्षकांच्या कामांचे मूल्यांकन योग्य पद्धतीने केले जात नाही असे विद्यापीठातील शिक्षकांनी निदर्शनास आणून दिले. सबब विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकषांमध्येच विद्यापीठातील शिक्षकांच्या कामांचाही उल्लेख असावा यासाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठ अनुदान आयोग, सातवा वेतन आयोग, निपा, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांमधील तरतुदींचा सविस्तर अभ्यास करण्यात यावा तसेच या विद्यापीठातील शिक्षकांच्या कामांचा त्यात समावेश कसा करता येईल याचा अभ्यास करून तसा अहवाल तयार करावा. |
| | | **मा. सदस्य श्रीयुत नरेंद्र जोशी यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या क्र. 198व्या बैठकीतील ऑनलाईन शिक्षणक्रमांबाबत माहिती घेतली. त्यावर मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळ यांनी विद्यापीठाची प्रगती पुढीलप्रमाणे अवगत करून दिली.**<br>1. शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर कॉमन वेल्थ ऑफ लर्निंगच्या धर्तीवर एम.के.सी.एल. यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणक्रम विकसित केला आहे. सदर शिक्षणक्रमासाठी महाराष्ट्रातील 10000 शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. याचे उद्घाटन मा. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत दि. 03-01-2025 रोजी विद्यापीठात करण्यात आले. त्यावेळी नाशिकच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी अनेक स्टॉल लावून माहिती दिली. सदर शिक्षणक्रम यशोक्सद्वारे सुरु आहे. त्याची लिंक सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात येईल.<br>2. 'महास्वयं' चे नाव बदलून आता 'महाज्ञानदीप'करण्यात आले. त्याचे उद्घाटन मा. चंद्रकांतदादा पाटील यांचेकडून करण्यात आले. याचा URL मिळाला आहे. आपल्या विद्यापीठाचा 'यशोक्स' या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. त्याच्यावर पहिला शिक्षणक्रम 'Generic IKS' हा मराठीतून अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातून 44,00,000 विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत आहोत. सुकाणू समितीच्या उपसमितीनेही या अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे.<br>3. महास्वयंसाठी अहमदाबाद आय.आय.टी. मधील श्रीयुत सहस्रबुद्धे यांच्या सहकार्याने विद्यापीठ ऑनलाईनमध्ये लीड करत आहे.<br>4. MBA, MCA, BCA असे व्यावसायिक पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने जानेवारी 2026 पासून ऑनलाईन सुरू करण्यात येणार आहे. त्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे.<br>5. 'यशोक्स' या प्लॅटफॉर्मवर सायबर साक्षरता हा सायबर इन्व्हेस्टिगेशनविषयी ओळख करून देणारा शिक्षणक्रम सुरू आहे. याच धर्तीवर 'सायबर सिक्युरिटी' हा पोलिस अधिकाऱ्यांना सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी उपयुक्त होणारा पदविका Dip. In Cyber Investigation हा शिक्षणक्रम सुरू करण्यात आला. हा शिक्षणक्रम 'यशोक्स' या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. याचे सादरीकरण महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री श्रीयुत देवेंद्रजी फडणवीस यांचेसमोर देण्यात येईल आणि भविष्यात त्यांचे |

| | | |
|---|---|---|
| | | आदेशान्वये सगळ्या पोलिस अधिकाऱ्यांना हा शिक्षणक्रम देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. 'यशोक्स' प्लॅटफॉर्मची लिंक सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात येईल.<br>6. विद्यापीठात आता देशी गायींचा गोठा तयार करण्यात येत आहे. त्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच विद्यापीठातील पेरूच्या बागेला बरीच वर्षे झाली असल्याने काही झाडांना कीडही लागली आहे. त्यामुळे पेरूला बाजारात विशेष मागणी नाही. म्हणून तेथे स्पेनमधील संत्रांच्या जातींची लागवड करण्याचा मानस आहे. विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्रामार्फत Avacado Farm विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे कृषी आणि कृषी पूरक विषयातही विद्यापीठ प्रगती करत आहे.<br>7. मा. सदस्य प्रो. डॉ. सरवदे यांनी पुढीलप्रमाणे सूचना केली.<br>विद्यापीठाने अभ्यासकेंद्र देताना कडक निकष लावून अभ्याकेंद्रांना मान्यता द्यावी. विद्यापीठाची अभ्यासकेंद्रे ही त्या त्या विभागातील विद्यापीठांच्या अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालांना दिली जातात. त्यामुळे जर एखाद्या विद्यापीठाने त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयाला काही शिक्षा केली असेल आणि ते मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र असेल तर मुक्त विद्यापीठाकडून त्या महाविद्यालयाला दिलेला अभ्यासकेंद्राचा दर्जा काढून घेतला जातो.<br>मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांची केलेल्या वरील विवेचनावर सर्व सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले आणि मा. कुलगुरू आणि विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले. |
| | | **वरील सर्व विषय याच बैठकीत वाचून याच बैठकीत मान्य करण्यात आले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाली.** |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**